राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध सेवांची जनजागृती - माध्यम आराखडा २०२६-२७

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५३/संगणक कक्ष (ई- १६२८१९०)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि.१० जुलै, २०२६

वाचा :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०२१/प्र.क्र.१२६/का-३४, दि.१३.०८.२०२१
२. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचे वृत्तचित्र शाखा/का-७, दि.०८.०५.२०२६ च्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना :-

विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय, लोककल्याणकारी योजना आणि शासकीय धोरणे महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी दैनंदिन प्रसिद्धी च्या पारंपरिक दृष्टिकोनात महासंचालनालयाने बदल करून आता 'वार्षिक माध्यम आराखडा नियोजन' करण्यावर भर दिला आहे. मा. मुख्य सचिव महोदयांच्या निर्देशानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी आपल्या विभागाच्या 'वार्षिक माध्यम आराखड्या'चा (Annual Media Plan) मसुदा तयार करण्याकरीता माहिती उपलब्ध करून देण्याची विनंती प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्याकडील दि.०८.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली. त्यानुसार राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत संगणकीकरण प्रकल्पाबाबत जनजागृती करण्याकरीता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत जाहिरातीद्वारे प्रसार व प्रसिध्दी करुन प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागामार्फत रू. १० कोटी खर्चाचा जाहिरातीच्या आराखड्याचा प्रस्ताव सादर केला.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१३.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय जाहिराती वितरण धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकांचे संगणकीकरण प्रकल्पाबाबत प्रचार व प्रसिध्दीसाठी सादर करण्यात आलेल्या माध्यम आराखड्यास

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजवणी समितीच्या दि.०८.०५.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत रु. ९,८७,७६,०००/- (अक्षरी नऊ कोटी सत्त्याऐंशी लक्ष शहात्तर हजार फक्त) इतक्या रकमेच्या जाहिरात माध्यम आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपुर्ण संगणकीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. तसेच विभागामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपुर्ण संगणकीकरण प्रकल्प व राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या आनुषंगिक प्रसिध्दी व प्रचार प्रभावीपणे करणे यासाठी जाहिरात व प्रसिध्दीच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहचविणे या उद्देशाकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजवणी समितीच्या दि.०८.०५.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार विभागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपुर्ण संगणकीकरण व राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या माध्यम आराखडा राबविण्यासाठी येणाऱ्या रु. ९,८७,७६,०००/- (अक्षरी नऊ कोटी सत्त्याऐंशी लक्ष शहात्तर हजार फक्त) (करांसहित) इतक्या खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रचार व प्रसिध्दी माध्यम आराखड्यानुसार येणाऱ्या अंदाजीत खर्चाचा सविस्तर तपशील सोबत जोडलेल्या विवरणपत्र अ मध्ये नमूद आहे.

३. प्रस्तुत बाबीकरिता होणारा खर्च लेखाशिर्ष "मागणी क्र. एम-३, ३४५१, सचिवालयीन आर्थिक सेवा, ०९०, सचिवालय, (००) (०६), सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण (राज्य योजना) (कार्यक्रम), (३४५१A०७३)-२६ जनजागृती" मध्ये उपलब्ध तरतुदीतून सन २०२६-२७ करिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

४. उपरोक्त खर्चास वित्तीय अधिकारी नियम पुस्तिका १९७८, शासन निर्णय क्र.रवका १०९८/५६७/प्र.क्र.२३३८/नापु-१२ दिनांक ३०.०८.१९९८ अन्वये भाग-दुसरा, उपविभाग- चार, अ.क्र.२६, अन्वये जाहीरातीवरील खर्चाबाबत प्रशासनिक विभागास असलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत मान्यता देण्यात येत आहे.

५. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने यानुषंगाने संबंधित जाहिरात एजन्सी/आस्थापनांना कार्यादेश देण्याबाबत पुढील कार्यवाही करावी. प्रस्तुत प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करतांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / आदेश/परिपत्रके यानुसार तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये निर्गमित नियम पुस्तिका १९७८ मधील तरतूदींचे/ अटी व शर्तीचे काटेकारपणे पालन करण्यात येईल.

६.        सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०७१०१३१९२११४०६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

PRADNYA DAGADU FATE

Digitally signed by PRADNYA DAGADU FATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=a848319143424ef222d686b2c55b1a6e0d81ab1491664293c31d122b6ed5db02, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=36E36169CC745B209AD8A11BCA00BFC33087D53E6BD16ACAC9DB647D10CB4F63, cn=PRADNYA DAGADU FATE
Date: 2026.07.10 13:20:20 +05'30'

**(प्रज्ञा दगडू फटे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्याक) यांचे सचिव यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
७. मा.राज्यमंत्री
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून),
१०. नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा मुंबई,
११. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१४. अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१५. अधिदान व लेखा अधिकारी मुंबई
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई
१७. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सर्व उप आयुक्त (पुरवठा),
१९. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
२०. सर्व अन्न धान्य वितरण अधिकारी
२१. सर्व उपनियंत्रक (शिधावाटप) मुंबई/ठाणे
२२. निवडनस्ती (संगणक कक्ष).

# विवरणपत्र अ

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या विविध योजनांच्या व्यापक प्रसिध्दीकरिता प्रस्तावित अंदाजित माध्यम आराखडा

(विभाग पत्र दि.१७ एप्रिल, २०२६)

| क्र. | माध्यम | स्वरुप | तपशिल | रक्कम (प्रती नग) | संख्या | एकूण अंदाजित रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (खर्च करांसहित) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | निर्मिती माध्यम | प्रिंट | प्रिंट आणि इतर बाह्य माध्यमांकरिता मजकूर (Adaptation, Translation, Formating from one media to other media) | १०,००० | ० | - | - | - |
| | | टिव्हीसी With Celebrity | TVC-१० ते ६० Sec-As per DVAP rate | २०,००,००० | ३ | ६०,००,००० | १०,८०,००० | ७०,८०,००० |
| | | टिव्हीसी | TVC-१० ते ६० Sec-As per DVAP rate | ५,७६,००० | ५ | २८,८०,००० | ५,१८,४०० | ३३,९८,४०० |
| | | जिंगल्स/स्पॉट | Audio Jingle (१० ते ६० Sec)As per DVAP rate | ४५,००० | ० | - | - | - |
| | Total A | | | | | ८८,८०,००० | १५,९८,४०० | १,०४,७८,४०० |
| क्र. | Media | मूळ दर, प्रक्रिया | Details | वारंवारिता | संख्या/दिवस | एकूण अंदाजित रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (खर्च करांसहित |
| बाह्य माध्यमाद्वारे प्रसिध्दी (प्रदर्शन शाखा) | | | | | | | | |
| १. | चित्ररथाद्वारे योजनांची प्रसिध्दी | विहीत ई-निवीदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | २१,००,००० | ३,७८,००० | २४,७८,००० |
| २. | धार्मिक स्थळे इत्यादी गर्दीच्या ठिकाणी जनजागृती करण्याकरिता फिरते प्रदर्शनाद्वारे प्रसिध्दी | विहीत ई-निवीदा प्रक्रियेद्वारे (Interactive Experience Station (DAVP दरानुसार)) | शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | २,५५,००,००० | ४५,९०,००० | ३,००,९०,००० |
| समाज माध्यमांद्वारे प्रसिध्दी | | | | | | | | |
| १. | सोशल मिडीया (Social Media) | विहीत ई-निवीदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ६० दिवस | २,२५,००,००० | ४०,५०,००० | २,६५,५०,००० |
| २. | डिजीटल मिडीया माध्यमाद्वारे प्रसिध्दी | विहीत ई-निवीदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ६० दिवस | २,२५,००,००० | ४०,५०,००० | २,६५,५०,००० |
| | Total B | | | | | ७,२६,००,००० | | ८,५६,६८,००० |
| | Total A+B | | | | | ८,१४,८०,००० | | ९,६१,४६,४०० |
| १. | शा.नि. दि.१३.०८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रक्कमेपर्यंतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रक्कमेसाठी २% (उर्वरित रक्कमेवर (रु.५ कोटी वजा जाता)) प्रमाणे | शासन निर्णय तरतुदीनुसार | माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च, वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च | | | २६,२९,६०० | | २६,२९,६०० |
| | TOTAL EXPENDITURE (A+B) | | | | | ८,४१,०९,६०० | | ९,८७,७६,००० |